दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२० • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२८ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मराठ्यांच्या लढ्याला मोठं यश



## मतासाठी नाही हितासाठी निर्णय घेतला-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई**-गेल्या अनेक महिन्यांपासून मराठा आरक्षणाचं घोंगड भिजत पडलं होतं. सर्वोच्च न्यायालयात याप्रकरणी पुनर्विचार याचिका दाखल असताना राज्यपातळीवरही हे टिकणारं आरक्षण देण्याकरता सरकार प्रयत्न करत होतं. अखेर मनोज जरांगे पाटलांच्या लढ्याला मोठं यश मिळालं आहे. मध्यरात्री तब्बल तीन तास चर्चा झाल्यानंतर सरकारने मनोज जरांगेच्या सर्व मागण्यांचे सुधारित अध्यादेश जारी करून त्यांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. यासंदर्भात मनोज जरांगे पाटलांनी मध्यरात्री पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. तसंच, येत्या काही वेळेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मनोज जरांगे पाटील उपोषण सोडणार आहेत.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील आंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघाले होते. परंतु, त्यांचं हे आंदोलन रोखण्याचा प्रचंड प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, मनोज जरांगेंनी काल २६ जानेवारी रोजी वाशीत भव्य जाहीर सभा घेतली. त्याआधी सरकारच्या शिष्टमंडळाने त्यांच्याबरोबर संवाद साधला होता. या चर्चेतही अंतिम तोडगा न निघाल्याने मनोज जरांगे पाटलांनी आजच्या दिवसाचा अल्टिमेटम दिला होता. त्यामुळे आरक्षण मिळालं तर गुलाल घेऊन येऊ, अन्यथा आंदोलनासाठी मुंबईच्या दिशेने कूच करू असा इशारा त्यांनी दिला होता. त्यांच्या इशाऱ्यानंतर सरकार पुन्हा कामाला लागलं. सरकारच्या शिष्टमंडळाने मनोज जरांगेंच्या शिष्टमंडळाबरोबर चर्चा केली आणि मनोज जरांगेंच्या सर्व मागण्या मान्य केल्या. महत्त्वाचं म्हणजे, या सगळ्या मागण्यांबाबत मनोज जरांगेंनी शासननिर्णय आणि लिखित पत्रे घेतली आहेत.मराठा समाजाच्या ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. सापडलेल्या नोंदींचे प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावं. तसंच त्यांच्या कुटुंबियांना ताबडतोब प्रमाणपत्र देण्यात यावेत, असा आपला लढा होता. ही प्रक्रिया सुरू झाली आहे. याबाबतचा डाटा सरकार थोड्याच दिवसांत देणार आहेत, असं जरांगे पाटील म्हणाले.ज्याची नोंद सापडली, त्याच्या सगेसोयऱ्यांनाही प्रमाणपत्र देण्याकरता अध्यादेश पारित करण्यात आला आहे. मराठा समाजाच्या मूळ मागण्या पूर्ण झाल्या आहेत. यावर तीन तास चर्चा झाली. मुंबई हायकोर्टाच्या वरिष्ठ वकिलांनी शब्दन् शब्द वाचून खात्री केली आहे, त्यानंतरच बाहेर पडलो, असंही जरांगे पाटलांनी स्पष्ट केलं.दोन वेगवेगळ्या बैठका होत्या, मंत्रिमहोदय आणि सचिवांची एक बैठक झाली आणि आमच्या वकील बांधवाची वेगळी बैठक झाली. सोयऱ्यांना प्रमाणपत्र देण्याबाबतचा अध्यादेश घेतला आहे. लढाई आपली यासाठी होती. तिसरा मुद्दा आंतरवालीसह राज्यभर मराठा आंदोलकांवर लावलेले गुन्हे मागे घेण्याचे पत्रही गृहमंत्र्यांनी दिलं आहे, अशी माहिती जरांगेंनी दिली.मराठवाड्यात आणि इतर नोंदी कमी सापडल्या आहेत. त्यामुळे या नोंदी शोधण्याकरता शिंदे समितीला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार, त्यांनी मुतदवाढ करण्याची मागणी मान्य केली असून याबाबत लेखी पत्र घेतले आहे. त्यानुसार, सर्व पत्र आणि शासननिर्णय घेतले आहेत. वंशावळ जोडण्यासाठी तालुकास्तरावर समिती स्थापन केली आहे. त्याचाही शासननिर्णय झाला आहे, अशी माहितीही जरांगेंनी दिली.समाजाचं मोठं काम झालं आहे. त्यामुळे समाज म्हणून आता आपला विरोध संपला. समाज म्हणून काम करत असताना आम्ही कोणत्याही पक्षाला सोडलं नाही. आता आपला लढा संपला आहे, त्यामुळे समाज म्हणून आपला विरोध आणि विषय संपला आहे, असं जरांगे म्हणाले.विजयाचा गुलाल उधळण्याकरता मनोज जरांगे पाटील मुंबईला जाणार होते. परंतु, आता ते मुंबईत जाणार नसल्याचं त्यांनी जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उपोषण सोडून ते आंतरवाली सराटीच्या दिशेने निघाणार आहेत. तसंच, आंतरवाली सराटीपेक्षा मोठी विजयी सभा घेण्यात येणार आहे. या भाषणाची तारीख थोड्याचवेळात जाहीर करण्यात येणार आहे, असंही ते म्हणाले.

## जिल्हा कृषि महोत्सव कार्यक्रमास अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी दिली भेट



**गडचिरोली । प्रतिनिधी**

२६ जानेवारी२०२४ रोजी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनती अभियान (उमेद), महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), आणि नाबार्ड यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत जिल्हा कृषि महोत्सव कार्यक्रमास ना. धर्मरावबाबा आत्राम, मंत्री, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी भेट दिली. यावेळेस त्यांनी कृषि महोत्सव कार्यक्रमात आयोजीत विवीध दालनांस भेट देऊन स्टॉलधारकांकडुन माहिती जाणून घेतली.

जिल्हाधिकारी संजय मीना गडचिरोली, श्रीमती आयुपी सिंग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. गडचिरोली, कुमार चिंता, अपर पोलिस अधिक्षक (प्रशासन), गडचिरोली, यतिश देशमुख, अपर पोलिस अधिक्षक (प्राणहिता), गडचिरोली, धनाजी पाटिल, अतिरीक्त जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी कृषि महोत्सवातील विवीध दालनांस भेट दिली. तसेच पंढरी डाखळे, प्रकल्प संचालक, आत्मा, गडचिरोली, बसवराज मास्तोळो, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, गडचिरोली, प्रशांत शिके, प्रकल्प संचालक, ग्रामीण बिकास यंत्रणा, गडचिरोली, विष्णूपंत झाडे, जिल्हा समन्वयक, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), आबासाहेच धापते, प्रकल्प उपसंचालक, आत्मा, गडचिरोली, श्रीमती अर्चना राऊत, नोडल अधिकारी, स्मार्ट प्रकल्प, गडचिरोली, प्रफुल भोपये, जिल्हा अभियान व्यवस्थापक, उमेद, गडचिरोली हे उपस्थित होते.डॉ. नितीन दुधे, पशुधन विकास अधिकारी, गडचिरोली यांनी रेबीज या रोगाविषयी तो कसा टाळता येईल याविषयी मार्गदर्शन केले. श्रीमती प्रतिभा चौधरी जिजामाता पुरस्कार प्राप्त महिला शेतकरी गडचिरोली यांनी कार्यक्रमास उपस्थित महिला शेतक-यांना मार्गदर्शन केले. डॉ. पवन पाबडे, पशुधन विकास अधिकारी, पं.स. अहेरी यांनी मुक्त संचार गोठा व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले, डॉ. प्रसाद भामरे, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पं.स. कुरखेडा यांनी मुक्त संचार फॉवडी पालन याविषयी मार्गदर्शन केले. प्रशांत एरोगवार, व्यावसायीक, मी अनुसया डेअरी संस्था, कोटगाल, ता. गडचिरोली यांनी आपल्या दुग्धव्यवसाय, दुग्ध संकलन, प्रक्रिया व विपनन विषयी आपले अनुभव व्यक्त केले. डॉ. यशवंत उमरदंड, पशुवैद्यकीय अधिकारी, अहेरी यांनी शेळीपालन विषयी मार्गदर्शन केले.आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृनधान्य वर्ष २०२३ निमित्त पौष्टीक तृनधान्य पाककला स्पर्धा आयोजीत करण्यात आली. या स्पर्धेत १० पेक्षा जास्त महिलांनी सहभाग घेऊन आपल्या पाककला प्रदर्शित केल्या. कृषि महोत्सवातील जेव प्रात्यक्षिके, दालने व कार्यशाळेस मोठ्या संखेने शेतकरी, महिला, विद्यार्थी व स्थानीक नागरीकांनी भेट दिली.

## आ.किशोर जोरगेवार यांनी घेतली मृतक शिवा वझरकर यांच्या कुटुंबीयांची भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गणतंत्र दिवसाच्या पूर्व संध्येला उद्धव ठाकरे शिवसेना गटाचे युवासेना शहरप्रमुख शिवा वझरकर याची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. दरम्यान आज आमदार किशोर जोरगेवार यांनी त्याच्या सरकार नगर येथील राहत्या घरी जात कुटुंबीयांची सांत्वन भेट घेतली आहे.

यावेळी त्यांनी पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेसी यांना दुरध्वनी वरुन संपर्क साधत महत्वपूर्ण सूचना केल्या आहे. यावेळी काँग्रस नेत्या चित्रा धांगे, शिवसेना जिल्हा प्रमुख प्रतिमा ठाकूर, शिवसेना महानगर प्रमुख भरत गुप्ता, यांची उपस्थिती होती.गुरुवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास शिवा वझरकर सरकार नगर येथे अग्रवाल कोचिंग क्लासेसजवळ एकाला भेटायला



गेला होता. तिथे दोघांमध्ये चर्चा सुरू असताना आरोपी घटनास्थळी आला व शिवा वझरकर यांच्यावर चाकूने वार केले. यात वझरकर गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्याला गंभीर अवस्थेत सरकार नगर येथील एका खासगी रुग्णालयात आणण्यात आले. तिथे उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरने मृत घोषित केले. या घटनेनंतर सरकार नगर तुकुम येथे तणावाची स्थिती निर्माण झाली होती. या प्रकरणी काही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.दरम्यान आज आमदार किशोर जोरगेवार यांनी शिवा यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी घडलेल्या घटनेची संपुर्ण माहिती जाणून घेतली. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्र सिंह परदेसी यांच्याशी दुरध्वनी वरुन संपर्क साधत संपूर्ण घटनाक्रम समजून घेतला. चंद्रपूर शहर शांत आहे. ही शांतता अबाधित राहिली पाहिजे. आपण या प्रकरणाची उच्च अधिकार्याकडून चौकशी करावी यासह अनेक महत्वपूर्ण सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी पोलिस अधिक्षक यांना केल्या आहे.

## शूरवी महिला महाविद्यालय मूल येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिनांक २६ जानेवारी २०२४ भारताचा ७५ वा प्रजासत्ताक दिवस शूरवी महिला महाविद्यालय मुल येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या विशेष अतिथी सपना सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

भारत मातेच्या प्रतिमेचे तसेच भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री माता कन्यका सेवा संस्थेचे सचिव राजेश्वर सुरावार होते तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाच्या



प्रभारी प्राचार्या हर्षा खरासे , अनिल दंडमवार, दिलीप नेरलवार जस्सुजी सिंघवी, अजय गोगुलवार, जीवन कोंतमवार,सोनाली कोल्पॅकवार अमृता तुंगुडवार, शिल्पा चिल्लरवार होते. कार्यक्रमाच्या विशेष अथिती सपना सुधीर मुनगंटीवार यांनी विद्यार्थीनिमध्ये देशप्रेम राष्ट्राभिमान निर्माण व्हावा यासाठी विद्यार्थीनींना मोलाचे मार्गदर्शन केले.

तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री राजेश्वर सुरावार यांनी देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या हुतात्म्यांच्या बलिदानाची आठवण करून दिली. तसेच संस्थेचे अध्यक्ष सुदेश कापर्तीवार यांनी उपस्थित सर्व विद्यार्थीनींना , प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थीनींनी देशभक्तीपर गीत व नृत्य सादर केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. हर्षा खरासे प्राचार्या( प्र.) यांनी केले व सूत्रसंचालन प्रा.डॉ.मीनाक्षी राईंचवार यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. आशिष आष्टनकर यांनी मानले.

# ३४ व्या मराठी प्राध्यापक परिषदेने प्राध्यापकांना काय दिले?

**मागील २ वर्षांपासून सह्याद्रीचा राखणदार हे लोकप्रिय दैनिक सातत्याने मराठी प्राध्यापक परिषदेच्या अधिवेशनातील प्रतिक्रिया छापण्याचा प्रयत्न करत आहे. आमच्याकडे ज्या प्रतिक्रिया येतात त्या कालमर्यादा लक्षात घेता प्रांजळपणे देण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. याही वर्षी प्रतिक्रिया व्यक्त करताना प्राध्यापकांचा भरभरून प्रतिसाद लाभला. एकाच दिवशी त्यामुळे एकाच दिवशी त्या प्रकाशित करता न आल्याने आज त्या प्रतिक्रियांचा उत्तरार्ध प्रकाशित करीत आहोत. आपण सर्वांनी प्रांजळपणे मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३४ व्या अधिवेशना संदर्भात ज्या प्रतिक्रिया कळवल्या त्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार.**



फेरफटका

**डॉ.यशवंत घुमे**
मो.९८२२२३३९१२
sahyandrinews@gmail.com







राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या संयुक्त विद्यमाने मराठी प्राध्यापक परिषदेचे ३४ वे अधिवेशन अत्यंत दिमाखात पार पडले .अलीकडे कला आणि इतर शाखेतील विषयाचा विचार केला तर प्राध्यापकांचा सुसंवाद बंद झालेला दिसतो. मात्र मराठी प्राध्यापक परिषद तेही दोन विद्यापीठ मिळून दोन दिवसीय अधिवेशन घेऊन मराठी प्राध्यापकांत सुसंवाद साधण्यात सातत्य राखत आहे, हे मी अतिशय महत्त्वाचे मानतो. त्यासाठी मी सर्वप्रथम मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव आणि इतर पदाधिकारी यांचे आणि संयोजकाचे मन:पूर्वक आभार मानतो. मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन होत राहावे आणि त्यात सहभागी होता यावे, ही माझी आंतरिक इच्छा असते. आतापर्यंत झालेल्या बहुतेक मराठी प्राध्यापक परिषद अधिवेशनाला मी उपस्थित होतो. यावर्षी डॉ .मधुकरराव वासनिक पी .डब्ल्यू .एस. महाविद्यालय ,नागपूर येथे ३४ वे मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात जे तीन परिसंवाद आयोजित केले होते ते वर्तमानकालीन भान असलेले परिसंवाद होते . वैदर्भीय साहित्य आकलन आणि आस्वाद , प्रसार माध्यमे आणि मराठी साहित्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वांग्मयीन योगदान या विषयावरील परिसंवाद अत्यंत महत्वपूर्ण होते. मराठी प्राध्यापक परिषदेने आयोजित केलेले अधिवेशन माझ्याबरोबरच नव अभ्यासाकांना दिशा देणारे ठरले.त्यातही मी एका परिसंवादाचा अध्यक्ष होणे हे मी माझे भाग्य समजतो. या अधिवेशनातील अविस्मरणीय गोष्ट म्हणजे माझे गुरुवर्य माझे एम. फिल .चे मार्गदर्शक डॉ.सुधीर रसाळ यांचे ३२ वर्षांनी भेटणे आणि त्यांनी मला आशीर्वाद देणे हे माझ्यासाठी खूपच मोलाचे होते. एखाद्या दोन दिवसीय अधिवेशनाचे आयोजन करीत असताना आयोजकांना किती त्रास सहन करावा लागतो, याची मला जाणीव आहे. त्यामुळे आयोजनावर मी समाधानी आहे .दरवर्षी मराठी प्राध्यापकांचे अधिवेशन होत असल्यामुळे नव्या – जुन्या प्राध्यापक मित्रांची आणि मार्गदर्शकांची भेट होणे महत्त्वाचे वाटते .एकूणच मराठी प्राध्यापक परिषदेला अधिवेशनाध्यक्ष म्हणून लाभलेले डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत अभ्यासनीय आणि विचार करायला लावणारे होते .मराठी प्राध्यापक परिषदेचे ३४ वे अधिवेशन अत्यंत यशस्वी झाले आणि नवं अभ्यासकांना नवी अभ्यासाची दालने खुली करून दिले यात शंका नाही.

**डॉ. हेमचंद दूधगवळी**
**शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, गडचादूर ,ता. कोरपना जिल्हा चंद्रपूर**

मराठी प्राध्यापक परिषदेने मला काय दिले..!
माझा मराठाचि बोलू कौतुके,
परि अमृतातेहि पैजा जिंके
संत साहित्याची जशी महत्ता आहे त्याचप्रमाणे या मराठी प्राध्यापक परिषदेची महत्ता आहे. वैचारिक विचारांची देवाण-घेवाण करणारी दिवाळी आहे. या प्राध्यापक परिषदेत अनेक वैचारिक, सामाजिक, बौद्धिक व सात्विकविचारांचे दीप पेटवून ज्ञानाचा प्रकाश देण्याचे काम ही परिषद सतत करीत आहे. अनेक नवनवीन वक्त्यांच्या प्रबोधनाने आपला प्राध्यापक जागृत होतो आणि जागृत झालेला प्राध्यापक पुन्हा नव्याने फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून उडी घेण्याचा प्रयत्न करतो. काही प्राध्यापक जेव्हा मला म्हणतात की, परिषदेने काय दिले? तेव्हा मला प्रश्न पडतो की, परिषदेने युवा नेतृत्वाला संधी दिली. गडचिरोली सारख्या आदिवासीबहुल भागातील प्राध्यापकांना स्टेज दिला. बोलण्याची संधी दिली. त्यांच्यातील कलागुणांना वाव दिला. ग्रामीण भागातील प्राध्यापक बोलता झाला. लिहिता झाला. या प्रवाहात आलेला दिसतो. प्राध्यापक परिषद ही स्नेह मिलनाची पर्वणी आहे. मागील पाच वर्षातील आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीत सतत एक ग्रामीण भागातील प्राध्यापक डॉ. गणेश मोहोड सर्वांचा समतोल साधून ही प्राध्यापक परिषद सांभाळत आहे. तेव्हा मला ज्ञानेश्वर माऊलीची आठवण होते. या प्राध्यापक परिषदेची संपूर्ण कार्यकारिणी, अधिवेशन संयोजक डॉ.मनीषा नागपुरे यांनी यावर्षी सुंदर व नीटनेटके असे अधिवेशनाचे आयोजन केले व प्राध्यापक परिषद संपन्न झाली. येथे जनाबाईची आठवण होते. अशी ही सर्वसमावेशक प्राध्यापक परिषद ,तिचे आयोजन-नियोजन आणि प्रत्येक प्राध्यापकाच्या मनात विचारांचे अंकूर फुलवण्याचे काम ही प्राध्यापक परिषद करीत असते. लेखनाची असो, पुरस्काराची असो किंवा त्यांच्यातील सुप्त कला गुण विकसित करण्याची असो. परिषदेने मला भरभरून दिले. फक्त प्राध्यापकांनी दोन दिवस वर्षातील द्यावे व त्याची अनुभूती घ्यावी. सांगता खूप येतील पण मर्यादा आहे. शेवटी एवढेच म्हणतो
प्राध्यापक परिषद घेत राहावं
विचारांचे ज्ञान देत राहावं
दोन दिवस परिषदेला येत राहावं
आपण सर्व परिषदमय व्हावं.

**डॉ.प्रवीण काळे**
**कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आर्वी**

अधिवेशनाचा उद्घाटन सोहळा अधिवेशनाचे पूर्वाध्यक्ष आणि सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या सत्कारासह सुगंधीत व आनंदमय वातावरणात पार पडला. विदर्भातील विविध साहित्यिक व त्यांच्या साहित्याचा आस्वाद घेण्यास मिळाला . विविध प्रसारमाधमे आणि मराठी साहित्य , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाङ्मयीन योगदान यामधून रामाजिक, राजकीय , वैचारिक आणि आधुनिक तंत्र- यंत्राची स्थित्यंतरे जोपासता आली. अधिवेशनात शिस्तबद्धता , सुसूत्रता आणि व्यवस्थितपणा दिसून आला. शिक्षणक्षेत्रातील विविध घटक , नवीन शैक्षणिक धोरण , भविष्यातील शिक्षणाचा व्यासंग कसा राहील याची प्रतीकेही निदर्शनास आली. हे अधिवेशन फक्त प्राध्यापकांच्याच हिताचे नव्हते, तर विद्यार्थी , समाज आणि राष्ट्र हिताचे होते. असे अधिवेशन दरवर्षी घेण्यात यावे . अशी आयोजन समितीला विनंती करतो .

**प्रा. रमेश म. धोटे**
**आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय देसाईगंज, जिल्हा- गडचिरोली**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३४ व्या अधिवेशनाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या तीन पिढ्यांच्या प्राध्यापकांची मांदियाळी जमलेली पाहणे, हा दुर्मिळ योग होता. या अधिवेशनाच्या निमित्ताने मराठी विषयाच्या अध्यापनाच्या संदर्भात घडून येणाऱ्या अनेक विकासात्मक कार्याची माहिती मिळाली.मुख्य अतिथी मा. डॉ. सुधीर रसाळ आणि अधिवेशनाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे या दोहोंची मार्गदर्शनपर भाषणे अतिशय उपयुक्त वाटली. मराठीची अध्यापन करताना नव्या दिशा देणारे हे अधिवेशन ठरले.

**डॉ संगीता खुरद**
**अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर**

या प्राध्यापक परिषदेमधून कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन कशा प्रकारे करायचे, ही प्रेरणा मिळाली. तसेच या परिषदेच्या सर्वच परिसंवादाचे विषय विविधांगी असल्यामुळे प्रत्येक वक्त्यांनी जी विषयाची मांडणी केली ती मांडणी कशा प्रकारची असायला पाहिजे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे मराठी प्राध्यापक परिषदेतील परिसंवाद होय. अधिवेशनाध्यक्षांचे अध्यक्षीय भाषण हे फार समृद्ध आणि संपन्न करणारे भाषण होते.या भाषणांमधून अध्ययन – अध्यापक प्रक्रिया ही निरंतर परिवर्तनवादी असते हे नव्याने मराठी प्राध्यापक परिषदेच्या निमित्ताने कळून आले.३४ व्या मराठी प्राध्यापक परिषदेची व्याख्यानमाला ही समृद्ध व्याख्यानमाला होती हे आवर्जून सांगावेसे वाटते.

कार्यक्रमाचे आयोजन,नियोजन, बैठक व्यवस्था, निवास व्यवस्था अगदी लक्ष वेधून घेणारी होती.कुठेही कमतरता जाणवली नाही.सायंकाळी संपन्न झालेल्या प्राध्यापकांची संगीत रजनी व सांस्कृतिक कार्यक्रमांनी तर वैचारिक थकवाच दूर केला.भोजन अतिशय स्वादिष्ट आणि रुचकर होते. महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी सर्वांचे हसतमुखाने स्वागत केले. अशा खेळीमेळीच्या वातावरणात दोन दिवस कसे निघून गेले हे सुद्धा कळले नाही. अधिवेशनाच्या संयोजिका डॉ. मनीषा नागपुरे व डॉ. अमृता डोरलीकर व त्यांचे महाविद्यालयीन सहकारी या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन. तसेच मराठी प्राध्यापक परिषद ज्या विश्वासाने कार्यरत आहेत ते डॉ.गणेश मोहोड ,डॉ.राजेंद्र वाटाणे. आपण ही चळवळ नि:स्वार्थ हेतूने कार्यसिद्धीस नेत आहात, त्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा.

**प्रा.डॉ. विनोद यु. भालेराव**
**बॅरि. शेषराव वानखडे महाविद्यालय मोहपा, जिल्हा नागपूर**

# स्वत:मधील देशभक्त जागविण्याचा संकल्प करूया-ना.सुधीर मुनगंटीवार

## प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम



**चंद्रपूर :** भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आजपासून सुरू झाले आहे. संविधानाने आपल्याचा जसे अधिकार दिले, तसेच कर्तव्य आणि दायित्वाचीसुध्दा जाणीव करून दिली आहे. या देशासाठी प्राणाची आहुती देऊन स्वातंत्र्याचा मंगलकलश ज्यांनी आपल्या हाती दिला आहे, त्या शहिदांचे स्मरण करून देशाला व लोकशाहीला पुढे नेण्यासाठी स्वत:मधील देशभक्त जागविण्याचा संकल्प करूया, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

पोलिस मुख्यालय येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय कार्यक्रमात ध्वजारोहण करतांना ते बोलत होते. यावेळी आमदार सुधाकर अडबाले, किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम. यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. भयमुक्त, भूकमुक्त, विषमतामुक्त भारत हा भाव संविधानात आहे, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, सर्व व्यसनांपासून मुक्त होऊन अमृत कलश हातात घेण्याचा संकल्प करणे, हाच खरा प्रजासत्ताक दिन आहे. आपल्याकडे नुकत्याच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे जिल्हा प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन केले. त्यासाठी जिल्हाधिकारी व संपूर्ण प्रशासन अभिनंदनास पात्र आहे. अयोध्या येथे झालेल्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला चंद्रपूरकरांनी 'सियावर रामचंद्र की जय' हा मंत्र लिहून एक आगळावेगळा विश्वविक्रम केला. त्याची गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉडमध्ये नोंद झाली आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात आता वाघांच्या संरक्षणासोबतच जटायूचे संवर्धन करण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्हा हा धान उत्पादक जिल्हा असून १ लक्ष ८४ हजार हेक्टरवर धानाची शेती केली जाते. राज्य सरकारने आता धानाचा बोनस वाढवून २० हजार रुपये हेक्टरप्रमाणे दोन हेक्टरपर्यंत ४० हजार रुपये मंजूर केले आहे. ऐकार्जुना येथे ३१ कोटी ९० लक्ष रुपयांत भाजीपाला संशोधन केंद्र उभे राहणार आहे. अजयपूर येथे पंजाब नॅशनल बँकेने १५ कोटी रुपये शेतीपयोगी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी उपलब्ध करून दिले आहे. सोमनाथ (ता. मूल) येथे कृषी महाविद्यालयासाठी १३५ कोटींची मान्यता प्राप्त झाली आहे. येत्या दोन वर्षात चंद्रपूर जिल्ह्यात ५००१ कि.मी. चे बळीराजा समृध्दी मार्ग शेतपाणंद रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्ह्यातील युवक-युवतींना वैमानिक होता यावे, यासाठी मोरवा (ता. चंद्रपूर) येथे फ्लाईंग क्लब स्थापन करून त्याचे लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे. केंद्रशासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेच्या ५४२.०५ कोटीच्या मलनि:स्सारण प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्वातंत्र संग्राम सैनिक कुटुंबातील सदस्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.

'मिशन फिट' अंतर्गत जिल्ह्यात आरोग्याच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाला गती देण्यात आली आहे. १४० खाटांचे कॅन्सर हॉस्पीटल तसेच बल्लारपूर येथे कामगारांसाठी १०० खाटांचे ई.एस.आय.सी. हॉस्पीटल उभे राहात आहे. 'मिशन स्वावलंबन' अंतर्गत पी.एम. विश्वकर्मा योजना, कौशल्य विकासासाठी निधीची तरतुद करण्यात आली आहे. तसेच एम.आय.डी.सी.च्या धर्तीवर आता एफ. आय.डी.सी. ची निर्मिती होणार असून ४८ कोटी रुपये मंजूर झाले आहे. 'मिशन कल्पवृक्ष' अंतर्गत बांबु पॅलेटचा उपयोग करण्यासाठी वनशेती, बांबु शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात अपूर्ण राहिलेल्या पायाभुत सुविधांचा विकास वेगाने पूर्ण करून आरोग्य संस्थांचे बळकटीकरण, शिक्षण, सिंचन, जैव विविधता उद्यान, दळणवळणाची उपलबधता आदींची कामे त्वरीत पूर्ण करण्यात येत आहे. तसेच सैनिकी शाळा, वन अकादमी, देखनी बसस्थानके, अनेक ठिकाणी ई- लायबरी, बॉटनिकल गार्डन, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नियोजन भवन, कोषागार भवन, अभ्यासिका, वसतीगृहे, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा क्रीडा संकुल, वन विभागाची आकर्षक विश्रामगृहे, इको पार्क, मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण भागातील कॉंक्रीट रोड असे जवळपास २२५ कामे सुरू आहेत. यापैकी काही पूर्ण झाली असून काही प्रगतीपथावर आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य आणि पराक्रमाची नव्या पिढीला जाणीव करून देण्यासाठी चंद्रपूर येथे २, ३ आणि ४ फेब्रुवारी रोजी 'जाणता राजा' हे महानाट्य आणि १७, १८ व १९ फेब्रुवारी रोजी महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे.

विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणा-या अधिकारी व कर्मचा-यांचा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आश्विनी लोनगाडगे, विष्णुवर्धन येरनी, राहुल पोहाणे, सुहास बनकर, ६७ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा व्हॉलीबॉल स्पर्धेतील सखी दोरखंडे, सई घिवे, कौशल्य, रोजगार व नाविण्यता विभागातर्फे विवेक अटलकर, अमियो दास, प्रिती पर्वे, सुरज गौरकार, प्रशंसनीय सेवेबद्दल पोलिस महासंचालकांचे विशेष सेवापदक पोलिस उपअधिक्षक राधिका फडके, पोलिस निरीक्षक सर्वश्री राजेश मुळे, शिवाजी कदम, प्रवीणकुमार पाटील, महेश कोंडावार, भरोसा सेलच्या पोलिस उपनिरीक्षक अश्विनी वाकडे, पोक्सो कायद्याची प्रभावी जनजागृती केल्याबद्दल दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) तसेच विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, उत्कृष्ट आशा स्वयंसेविका म्हणून ममता भिमटे, यशोदा राठोड, संदेश मामीडवार आदींचा समावेश होता.

# रासेयो श्रमसंस्कार शिबिर समाजसेवेचे उत्तम साधन-प्रा.दिपक गुंठेवार




**गोंडपिपरी-**विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करताना त्यांचा बौद्धिक भावनिक आणि क्रियात्मक विकास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबिर घेण्यात येतो गावागावात स्वच्छता आरोग्य पर्यावरण संवर्धन यासाठी सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून कार्य करणे हेच या शिबिराचे खरे फलित आहे रासेयो शिबिर हे समाजसेवेचे उत्तम साधन आहे असे प्रतिपादन विध्याभारती शिक्षण संस्थेचे सचिव प्रा.दीपक गुंठेवार यांनी केले.

कला- वाणिज्य महाविद्यालय. गोंडपिपरी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दि.९ जानेवारी ते १५ सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर तारसा(बुज) येथे पार पडले यावेळी ये बोलत होते.

युवकांनी आपल्या उर्जेचा उपयोग समाज विकासाकरीता करावा. असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष सुभाषसिह गौर यांनी व्यक्त केले. शिबीरामधे गावाचा विकास व्हावा या माध्यमातुन विविध विषयांवर समाजप्रबोधनात्मक बौद्धीक, सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आले.यात व्यक्तिमत्व विकास, महिला सक्षमीकरण,पर्यावरण संवर्धन काळाची गरज या विषयांवर प्रा.संतोष बांदुरकर, राजकपुर भडके,प्रा.रश्मी मोटघरे ,रत्ना आस्वले यांनी मार्गदर्शन केले.कराटे प्रशिक्षक कुंदन पेंदोर यांनी मुलांना व मुलींना कराटे च्या माध्यमातुन स्वसंरक्षणाची प्रात्यक्षिके करून दाखवली.यावेळी उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सुभाषसिंह गौर,प्रा.दिपकजी गुंठेवार,उपसरपंच माधुरी येलेकर,माजी जी प सदस्य वैष्णवी बोडलावार,प्राचार्य लता जांभुळकर उपस्थित होते.शिबिराच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता खाडे,प्रा.डॉ ढवळे,प्रा.चव्हाण, प्रा.पोटवार,प्रा. विरूळकर यांनी अथक परिश्रम घेतले.

# मुंबईच्या ग्रँट रोड परिसरात लाकडाच्या गोदामाला भीषण आग;एकाचा मृत्यू

**मुंबई-**मुंबईतील ग्रँट रोड परिसरातील टिंबर मार्केटमध्ये भीषण आग लागली आहे. मध्यरात्री २ च्या सुमारास टिंबर मार्केट चोर बाजार , कामाठीपुरा येथे भीषण आग लागल्याची माहिती समोर आली आहे. अग्निशमन दलाच्या २० पेक्षा अधिक गाड्या घटनास्थळी दाखल असून अग्निशमन दलाच्या जवानांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ही आग कशामुळे लागली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र या आगीमुळे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.सध्या अग्निशमन दलाच्या जवानांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहे. आग लागताच स्थानिकांनी बाहेर धाव घेतल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, आगीच्या ठिकाणी एकाचा मृतदेह आढळला असून पुढील प्रक्रियेसाठी तो जे जे रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. आगीमुळे लाखो रुपयांचं नुकसान झाले आहे. मागील काही दिवसांपासून मुंबईत सातत्याने आगीच्या घटना घडत आहेत. बुधवारी (२४ जानेवारी) गोरेगाव पश्चिमेकडील इमारत आणि राम मंदिर परिसरातील एकमेव इंडस्ट्रियल आग लागल्याची घटना घडली.

# गोंडपिपरी नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीचे पार पडले लोकार्पण

## नवीन इमारतीतून जनतेच्या विकासात्मक कार्याचा पाया रोवला जाईल–आ.धोटे

**गोंडपीपरी । प्रतिनिधी**

नगरपंचायतीला नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य योजनेतून व अनुदानातून १.५० कोटी रुपये निधीतून तय्यार झालेल्या गोंडपीपरी नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण दि (२६) जानेवारी शुक्रवारी आमदार सुभाष धोटे यांच्या हस्ते पार पडले.

गोंडपिपरी तालुक्याच्या विकासाबाबत मी नेहमीच प्रयत्न केले असून तालुक्यातील समस्येवर विधानसभेत देखील प्रश्न मांडले आहेत.मोठ्या परिश्रमाने विकास निधी खेचून आणला.त्यानंतर देखील विकास कामे करतांना अनेक ठिकाणी विपरीत परिस्थिती निर्माण झाली.त्या परिस्थितीतून मार्ग काढून जनतेच्या सेवेसाठी नगर पंचायत ची भव्य इमारत याठिकाणी उभी झाली असून इथून जनतेच्या विकासात्मक कार्याचा पाया रोवला जाईल असे प्रतिपादन आ.सुभाष धोटे यांनी केले.आमदार सुभाष धोटें नगरपंचायत इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.




यावेळी राजुराचे माजी नगराध्यक्ष अरुण धोटे,काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष देवेंद्र बट्टे,नगराध्यक्ष सविता कुडमेथे,उपनगराध्यक्ष सारिका मडावी,काँग्रेस तालुकाध्यक्ष तुकाराम झाडे,नगरसेवक अनिल झाडे,सविता देवगडे,सुनील संकुलवार,यादव बांबोडे,सोनी दिवसे,कार्याध्यक्ष निलेश संगमवार,शहर अध्यक्ष राजू झाडे,मुख्याधिकारी डॉ. सुरज जाधव,माजी सभापती बजारसमिती सुरेश चौधरी,शंभू येलेकर,अजय माडूरवार,सरपंच देविदास सातपुते,अशोक रेचनकर,विनोद नागापूरे, बालाजी चणकापूरे,संतोष बंडावर, नामदेव सांगडे,राजिवसिंह चंदेल,संजय माडूरवार,तुकेश वानोडे,श्रीनिवास कुंदुनिरीवार, विपीन पेद्दुलवार,काँग्रेस तालुका उपाध्यक्ष नितेश मेश्राम यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकार्पण सोहळ्याला ४ काँग्रेस नगरसेवकांची दांडी....

२६ जानेवारीला नगरपंचायतच्या नवीन इमारतीचे लोकार्पण पार पडले.मात्र सुरुवाती पासूनच लोकार्पण वादात सापडले.सत्ताधारी चार नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली.लोकार्पण संदर्भात कुठलीही बैठक किंव्हा चर्चा सभागृहात नगराध्यक्ष, मुख्यधिकारी यांनी निर्णय घेतल्याने काँग्रेस नगरसेवक सचिन चिंतावार,वनिता वाघाडे,सुरेश चीलनकर, रामगिरकर गैरहजर राहीले.काँग्रेस पक्षाचेच नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने नागरिकात वेगळीच चर्चा रंगू लागली.नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचा मनमानी कारभार सुरू असल्याचे यावेळी सुरेश चीलंनकर यांनी सह्याद्रीचा राखणदार शी बोलताना सांगितले.

# प्रजासत्ताक दिनी शिवकृपा महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली तंबाखू मुक्तीची शपथ

## विद्यार्थी परिषदेच्या रॅलीत खासदारांचा सहभाग

**गडचिरोली । प्रतिनिधी**

येथील शिवकृपा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात शनिवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्व विद्यार्थी आणि शिक्षक, तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ न घेण्याची शपथ घेतली. यावेळी खासदार अशोक नेते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याशिवाय खासदार यांचे जनसंपर्क कार्यालयात व साईकृपा पतसंस्थेत खा.नेते यांनी ध्वजारोहण करून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या रॅलीत सहभाग घेतला.

शिवकृपा महाविद्यालयातील प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.पी. दुर्गम, प्रा.झाडे, प्रा.मोहरले, प्रा.रोहनकर, प्रा.विश्वास, प्रा.वाटेकर,शेटे बाबु,प्रविण कांबळे,यांच्यासह शिक्षकतेकर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.खा.अशोक नेते यांच्या चामोर्शी मार्गावरील जनसंपर्क कार्यालयातील ध्वजारोहण कार्यक्रमाला आ.डॉ.देवराव होळी,




भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, लोकसभा विस्तारक बाबुराव कोहळे, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, योगिता पिपरे, जिल्हा उपाध्यक्ष दामोधर अरिगेला, सुधाकर येनगंदलवार, अनिल पोहनकर, अनिल कुनघाडकर, भारत खटी, रंजिता कोडाप, मुक्तेश्वर काटवे आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते. साईकृपा पतसंस्थेतील कार्यक्रमाला महादेव पिंपळशेडे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.प्रजासत्ताक दिनानिमित्त अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. या रॅलीत खा.अशोक नेते यांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला. यावेळी लोकसभा विस्तारक बाबुराव कोहळे, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा उपाध्यक्ष दामोधर अरिगेला तसेच मोठ्या संख्येने अभाविपचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# नामदार सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रात प्रजासत्ताक दिन उत्साहात

**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील नामदार सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रात भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. तसेच संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. राष्ट्रगीत गाऊन तिरंगा झेंड्यास सलामी देण्यात आली.यावेळी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, माजी जि.प सभापती नितु चौधरी, माजी पं.स. उपसभापती निरीक्षण तांड्रा, माजी उपसरपंच संजय तिवारी, माजी सरपंच संतोष नुने, माजी जि.प सदस्य चिन्नाजी नलभोगा, वाहतूक आघाडीचे विनोद चौधरी, माजी ग्रामपंचायत सदस्य सिनू इसारप, नंदा कांबळे, सुचिता लुटे, वैशाली ढवस, प्रयास सखी मंच मार्गदर्शिका अर्चना भोंगळे, अध्यक्षा किरण बोढे, जेष्ठ नागरिक संघाचे मधुकर मालेकर, नीलकंठ नांदे, भाऊराव मोहजे, पुंडलिक खनके, कोमल ठाकरे, पियुष




भोंगळे, शाम आगदारी, प्रवीण सोदारी, बबलू सातपुते, अनिल मानकर, हेमंत पाझारे, रज्जाक शेख, निरंजन नगराळे, अमोल थेरे, पुष्पा रामटेके, सुनीता पाटील, मंगेश पचारे, गणेश खुटेमाटे, गुड्डू तिवारी, तुलसीदास ढवस, भारत साळवे, धनराज पारखी, दिलीप कांबळे, अमीना बेगम, अनुसया चिडे, चंद्रकला मन्ने, आशा उरकुडे, वैशाली ठमके, नजमा कुरेशी, शारदा झाडे, अनिल नीत, सुरेंद्र भोंगळे, सुरेंद्र जोगी, दिनेश बांगडे, सांभशिव खारकर, पत्रकार सुरेश खडसे, सुनील राम, प्रमोद भातकुले, मुस्तफा शेख, मुज्जू लोहाणी, आदी उपस्थित होते.संचालन साजन गोहने यांनी केले.

# लॉयडस मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनी सूरजागड येथे वयोवृद्धाच्या हस्ते ध्वजारोहण



**एटापल्ली । प्रतिनिधी**

भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७५ व्या वर्धापन दिन समारंभा निमित्ताने ध्वजारोहणाचा कार्यक्रम माईन्स कॉम येथील मैदानावर हेडरी येथिल प्रतिष्ठित व्यक्ती,९० वर्षीय वयोरुद्ध पांडू कोत्तूं तेलामी यांच्या हस्ते संपन्न झाला असून यांना संचालक यांचे हस्ते शाल, श्रीफळ आणि बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

लॉयडस मेटल कंपनी कडून अधिकारी, कर्मचारी यांचे विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यात विजेता संघाना मान्यवरांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.यावेळी लॉयडस मेटल कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी सह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वढोलीत व्यापारी संघटना कार्यकारणी गठित



**गोंडपीपरी । प्रतिनिधी**

सांस्कृतिक नगरी असलेल्या वढोली गावचे एक वेगळे वैशिष्ट्य तालुक्यात राहिले आहे.या गावाने नेहमीच आपला वेगळेपणा जपला आहे.याच पार्श्वभूमीवर व्यापारी जगतात असलेल्या सर्वांचे संघटन उभारून एकमेकास सहाय्य करण्यास व्यापाऱ्यांच्या हितासाठी व्यापारी संघटन उभे केले.संघटनाच्या माध्यमातून उभे होणारे पैसे संघटनेतील गरजूंना दुःखाच्या क्षणी मदतीचा हात पूढे करण्यासाठी उपयोगी आणण्याचे यावेळी ठरले.दि.२६ (शुक्रवारला) कुलथा येथे मंदिरात बैठक पार पडली सर्वानुमते श्रीकांत कांनकाटे यांची अध्यक्ष,विकास मेदाडे उपाध्यक्ष,एकनाथ चुधरी सचिव,रुपेश नामेवार सहसचिव,खेत्री देवाडे यांची कोषाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

# भारतीय जनता पार्टी घुग्घुसतर्फे भोजनदान




**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील भारतीय जनता पार्टी तर्फे शुक्रवार, २६ जानेवारी रोजी दुपारी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बौद्ध बांधवांना भोजनदान करण्यात आले.याप्रसंगी मोठया संख्येत बौद्ध बांधवांनी भोजनदानाचा लाभ घेतला.यावेळी भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, माजी सरपंच संतोष नुने, साजन गोहणे, कुसुम सातपुते, पूजा दुर्गम, सिनू इसारप, बबलू सातपुते, प्रवीण सोदारी, दिनेश बांगडे, हेमंत पाझारे, अमीना बेगम, अतुल चोखांद्रे, सिनू कोत्तूर, धनराज पारखी, सुनंदा लिहीतकर उपस्थित होते.

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्यामुळे दूर झाला चिमुकलीचा श्रवणदोष

## पुन्हा मिळाले ऐकण्याचे वरदान,विशेष बाब म्हणून जिल्हा वार्षिक योजनेतून ७ लक्ष ५० हजार रुपये

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सात वर्षाच्या चिमुकलीला जन्मापासूनच श्रवणदोष होता. आपल्या लेकीला ऐकायला येत नसल्याचे कळल्यापासून कुटुंबीय हताश होते. एक शस्त्रक्रिया तर आटोपली, पण शंभर टक्के श्रवणदोष दूर होण्यासाठी कॉक्लर न्युक्लियस ८ साऊंड प्रोसेसर घेण्यासाठी आर्थिक अडथळा निर्माण झाला. अशात वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार देवदूतासारखे धावून आले आणि तात्काळ मदतीचे आदेश दिले. आई–वडिलांनी आवाज दिल्यानंतर चिमुकलीने प्रतिसाद दिला आणि कुटुंबियांच्या चेहऱ्यावरचा आनंद गगनात मावेनासा होता.

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्यामुळे मुक्काम पोस्ट पिपरी तालुका कोरपना येथील एका सात वर्षीय चिमुकली युवानी तिखट हिला पुन्हा ऐकण्याचे वरदान प्राप्त झाले आहे. ती जन्मापासूनच दोन्ही कानांनी ऐकण्यास असमर्थ होती. युवानीवर कॉक्लर इम्प्लांट सर्जरी करण्यात आली होती. परंतु ऐकू येण्यासाठी न्युक्लियस साऊंड प्रोसेसर इम्प्लांटवर राहणे नितांत गरजेचे होते. शस्त्रक्रियेनंतर मिळालेले साऊंड प्रोसेसर खराब झाल्याने तिला पुन्हा ऐकण्यास अडथळा येऊ लागला. कॉक्लर न्युक्लियस साऊंड प्रोसेसर घ्यायला जवळपास ७ लक्ष ५० लक्ष रुपयांचा खर्च होता. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने कुटुंबियांसाठी एवढा पैसा जमवणे केवळ अशक्य होते. त्यामुळे तिखट कुंटुंबाने राजुरा येथे भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांची भेट घेतली. देवराव भोंगळे यांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांना यासंदर्भात सहकार्य करण्याची विनंती केली .ना. मुनगंटीवार यांनी क्षणाचाही विलंब न लावता युवानीला आर्थिक मदत करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. विशेष बाब म्हणून जिल्हा वार्षिक योजना सन २०२३ –२४ या निधीतून ७ लक्ष ५० हजार रूपये मंजूर करण्याचे आदेश ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. निधी प्राप्त होताच कॉक्लर न्युक्लियस साऊंड प्रोसेसर घेऊन देण्यात आल्याने तिला आता पुन्हा ऐकायला येऊ लागले आहे. कॉक्लर इम्प्लांटमुळे १०० टक्के श्रवणदोष असलेल्या मुलांनाही ऐकू यायला लागते. परंतु शस्त्रक्रिया झाल्यानंतर लागण्यात येणाऱ्या कॉक्लर न्युक्लियस साऊंड प्रोसेसर महागडे असल्याने अनेक पालकांपुढे आर्थिक गणित जुळविण्याचे मोठे आव्हान असते. अशात ना. सुधीर मुनगंटीवार देवदूतासारखे धावून आल्याने युवानीचा आता ऐकता येणे शक्य झाले आहे. तिखट कुटुंबीयांसह कोरपना तालुक्यातील नागरिकांनी देखील ना. मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.



सह्याद्रीचा राखणदार



# प्रजासत्ताक दिन म्हणजे संविधानातुन मिळालेल्या अधिकाराचा उत्सव - आ.किशोर जोरगेवार

## घुग्घुस येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचा वर्धापन दिन साजरा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिन हा राष्ट्रीय सण असून प्रत्येक भारतीयांना या सणाचा अभिमान आहे. आजच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला बहाल केलेल्या संविधानातुन मिळालेल्या अधिकाराबरोबरच कर्तव्याचीही जाणीव आपण ठेवली पाहिजे. प्रजासत्ताक दिनी संविधानातून नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व बहाल झाले असून प्रजासत्ताक दिन म्हणजे संविधातून मिळालेल्या अधिकाराचा उत्सव असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

घुग्घूस येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचा वर्धापण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त भव्य धम्म संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रामात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला औरंगाबाद येथील भंते करुणानंद थेरे, भंते धम्मानंद, भंते धम्मबोधी थेरो, भंते श्रध्दारक्खित, भंते संघरतन, भंते रत्नमणी थेरो, घुग्घूस नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. जितेंद्र गादेवार, वेकोली महाप्रबंधक आभाचंद्र सिंह, सेंट थॉमर्स चर्च चे पास्टर रेव्ह. मार्कोस खांडेकर, घुग्घूस गुरुद्वारा कमिटीचे अध्यक्ष सरदार संम्मत सिंह दारी, इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या संचालीका शहनाज पठाण,



श्री सत्यशिव गुरुदेव सेवा मंडळाचे मधुकर मालेकर, यंग चांदा ब्रिगेडच्या उषा आगदारी, स्वप्नील वाढई, भारती सादारी, वनिता नियाल, ज्योसना मस्के, किरण टिपले, कामीनी देशकर आदींची उपस्थिती होती.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या वकृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात रुजवीले डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीति, अत्याचार, अन्यायास त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड असल्याचे ते मानायचे असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना केवळ कायदेशीर कागदपत्र नाही हा एक सामाजिक करार आहे जो आपल्याला एक वैविध्यपूर्ण आणि एकसंध राष्ट्र म्हणून एकत्र बांधतो. आम्हाला आमची मते व्यक्त करण्याचा अधिकार देतो. आजच्या या दिवशी आपण आपल्या राष्ट्राच्या वाढीसाठी आणि समृद्धीसाठी सकारात्मक योगदान देणारे जबाबदार नागरिक बनण्याचा संकल्प करु, असेही ते यावेळी म्हणाले.

### मदरसा येथे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते ध्वजारोहन

प्रजासत्ताक दिना निमित्त विविध कार्यक्रम करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते मदरसा येथे ध्वजारोहन करण्यात आले. या कार्यक्रमाला यंग चांदा ब्रिगेडच्या अपल्संख्याक विभागाचे युथ शहर अध्यक्ष राशिद हुसेन, मदरसा कमेटीचे अध्यक्ष मुस्ताक खाँन, सचिव अलताफ अली, उपाध्यक्ष इरफान बाबा, उपसचिव हसन सिध्दीकी, फैजान बाबा, अब्दुल सहिद अब्दुल वाहिद, शेख सिराद शेख मिसार, आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांनी तिरंग्याला सलामी दिली. त्यानंतर राष्ट्रगीत झाले या कार्यक्रमाला मदरसा कमिटीच्या सदस्यांची व नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी मिठाई वाटप करण्यात आली.

## छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे प्रजासत्ताक दिन साजरा



**वरोरा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय सेवा महाविद्यालय सूर्ला वरोरा येथे प्रजासत्ताक दीन साजरा करण्यात आला या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.दिनकर गुरनुले यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व समजावून सांगितले . प्रमुख मार्गदर्शक प्रा. विनोद कोरडे यांनी संविधानाचे महत्त्व पटवून सांगितले तसेच प्रा. दिपक खामनकर , प्रा. मनोज खंडाळकर, प्रा. भारती पाटील ,प्रा.सुहास झाडे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी समिक्षा जिवतोडे तर आभार प्रदर्शन दिपाली सायखेडे यांनी केले. तसेच तुषार कडू , हर्षद ढवस व रमेश जीवतोडे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले. तसेच पोलिस स्टेशन वरोरा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन द्वितीय पारितोषिक पटकावले.

## सोमवारला घुग्घूस शहर व ग्रामीण भागातील भूमिपुत्र, शेतकरी, बेरोजगारांच्या कंपनीवर धडक मोर्चा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

घुग्घूस शहर, ता. चंद्रपूर येथील भूमिपुत्र युवा संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन दिलेहोते.या निवेदनात संघटनेने घुग्घूस शहर व ग्रामीण भागातील भूमिपुत्र, शेतकरी, बेरोजगारांच्या मागण्यांवर योग्य ती साकारात्मक चर्चा न झाल्याने दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजीकंपनीवर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे .या मागण्यांमध्ये घुग्घूस शहर व ग्रामीण भागातील स्थानिक सुशिक्षित व बेरोजगार युवक व युवतींना त्यांच्या शिक्षणानुसार नोकरीत सामावून घेणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या वतीने मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या प्रदूषणामुळे लोकांना अनेक आजारांचा सामना करावा लागतो, म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चौकशी करून कंपन्यांवर कारवाई करणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या माध्यमातून अनेक वर्षापासून घुग्घूस ते पांढरकवडा पांदन रस्ता आणि घुग्घूस ते सेनगाव पांदन रस्तावर केलेला अतिक्रमण हटवणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीने शहर व ग्रामीण भागात सन २०१३ पासून ते आजपर्यंत सी एस आर फंडातून केलेल्या खर्चाची कार्याची चौकशी करणे, जिल्ह्याधिकारी यांनी सदर लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या भोंगळ कारभाराची सखोल चौकशी करून कारवाई करणे, विस्तारीकरणात ज्या शेतकऱ्याच्या जमिनी कंपनी अधिग्रहित करते त्या जमिनींचा मोबदला हा शेतकऱ्यांना थेट मिळावा, कंपनीचे अधिकारी यांनी विस्तारीकरणाच्या जनसुनानीच्या नोटिफिकेशनमध्ये जाहीरपणे सांगितले की कंपनीच्या परिसरात किमान दोन लाख वृक्षारोपण करण्यात आले असे खोटे व चुकीची माहिती सादर केलेल्या कंपनीवर कडक कारवाई करणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कंपनीत कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा आणि त्यांना योग्य पगार किमान २० हजार ते २५ हजार रुपये देण्यात यावे, कंपनीची स्थापना ज्यावेळी झाली त्यावेळी अनेक लोकवस्तीचे पुनर्वासन करताना सर्वे क्रमांक १६७ आराजी ६३.६७३७ चौ.मी. एकूण ६२ प्लॉट रहिवासा करिता पुरावतीत आहे. जमिनीचे पट्टे देऊ असे खोटे आश्वासन कंपनी मार्फत देऊन त्या लोकवस्तीना स्थलांतरित करण्यात आले, लाइट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीचे जड वाहतूक शहराच्या मध्यभागातून होत असल्याने दुर्घटनाला आमंत्रण नाकारता येत नाही. म्हणून कंपनीचे जड वाहतूक शहराच्या मध्यभागातून बंद करण्यात यावे,स्थानिक महिला बचत गटांना कंपनीच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातून घरेलू उद्योगाकरिता प्राधान्य द्यावेयांचा समावेश आहे.या सर्व मागण्यांवर योग्य निर्णय घेण्यात यावा आणि न्याय द्यावा यासाठी भूमिपुत्रांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.भूमिपुत्रांच्या वरील मागण्यांवर योग्य ती साकारात्मक चर्चा न झाल्यास दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी कंपनीवर धडक मोर्चा काढण्यात येईल, अशी चेतावणी संघटनेने दिली आहे.

## माजी जि.प.अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते ध्वजारोहण

**एटापल्ली । प्रतिनिधी**

तालुका मुख्यालयातील भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय येथे माजी जि प अध्यक्ष तथा भगवंतराव मेमोरियल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी प स सभापती बेबीताई नरोटे,जेष्ठ नागरिक दत्तात्रय राजकोंडावार,पौर्णिमा श्रीरामवार, सामाजिक कार्यकर्ते जयराज हलगेकर,प्राचार्य डॉ बूटे,मुख्याध्यापक धनंजय पोटदुखे आदी मान्यवर उपस्थित होते.



## खासदार अशोक नेते यांच्या शुभहस्ते प्रजासत्ताक दिनी तेरा मोबाईल मेडिकल युनिटचे लोकार्पण

**गडचिरोली । प्रतिनिधी**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित साधून पी.एम जनमत योजने अंतर्गत जिल्हा परिषद आरोग्य विभाग गडचिरोली येथे आदिम जमातीच्या लोकांना उत्तम, दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, आदिम जमातीचे लोक हे अतिदुर्गम भागात राहत असल्याने त्या दुर्गम भागात आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पी.एम जनमत योजने अंतर्गत जिल्ह्यासाठी तेरा मोबाईल मेडिकल युनिट मंजूर करण्यात आले.

हे मोबाईल मेडिकल युनिट प्रत्येक दुर्गम भागात जाऊन आरोग्याच्या विविध सेवा पुरविण्यात यावे. यासाठी फिरते आरोग्य तपासणी पथक म्हणून गडचिरोली जिल्ह्याकरिता तेरा मोबाईल मेडिकल युनिटचे लोकार्पण खासदार अशोक नेते यांच्या शुभहस्ते फित कापून हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.यात धानोरा,एटापल्ली, भामरागड,अहेरी येथे दोन मोबाईल मेडिकल युनिट व बाकी प्रत्येकी एक एक तालुक्यात अशा पद्धतीचें तेरा मोबाईल मेडिकल युनिट चे प्रजासत्ताक दिनी मंजूर मोबाईल मेडिकल युनिटचे लोकार्पण करण्यात आले.या मोबाईल मेडिकल युनिटमध्ये एक मेडिकल ऑफिसर,एक एनएम,एक



फार्मासिस्ट,एकलॅब टेक्निशियन व एक ड्रायव्हर अशा प्रकारचे पाच लोकांचा समूह या मोबाईल युनिटमध्ये काम करण्याकरिता समाविष्ट आहे.याप्रसंगी खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनु. जनजाती मोर्चा चे अशोक नेते,आमदार डॉ.देवराव होळी, लोकसभा विस्तारक बाबुराव कोहळे, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, विधानसभा विस्तारक दामोदर अरिगेला,जिल्हा उपाध्यक्ष भारत खटी,मुख्याधिकारी आयुषी सिंह ,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दावल साळवे,अति. मुख्याधिकारी भुयार , डॉ.प्रफुल हुलके, डॉ.विनोद म्हशाखेत्री,डॉ.पंकज हुलके, तसेच मोठ्या संख्येने आरोग्य अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## माजी पालकमंत्री श्रीमंत राजे अंब्रिशराव आत्राम यांच्या हस्ते प्रसिद्ध पंढरपुरी चाय चे शुभारंभ

### श्रीराम जन्मभूमी येथील मंदिरातील मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेच्या शुभ मुहुर्तावर शुभारंभ



**अहेरी । प्रतिनिधी**

येथील आझाद चौकात प्रसिद्ध पंढरपुरी चाय कॅफे चा उद्घाटन श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथील भव्य नवनिर्माण मंदिरातील मूर्तीचे प्राणप्रतिष्ठाच्या शुभ मुहूर्ताच्या दिवशी माजी राज्यमंत्री तथा पालकमंत्री गडचिरोली जिल्हा श्रीमंत राजे अंब्रिशराव आत्राम यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.यावेळी भाजपा च्या पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच चाय प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.अहेरी येथे सुरुवात करण्यात आलेला पंढरपुरी चहा कॅफे त्याच्या चवीसाठी प्रसिद्ध आहे. येथे तुम्ही मसाल्यांनी समृद्ध महाराष्ट्राच्या खास पंढरपुरी चहाचा आस्वाद घेऊ शकता.या चहाची चव घ्यायची असेल तर इथे यायलाच हवे. महाराष्ट्र चहाचे फार कमी ठिकाणी सापडेल आणि त्यापैकी एक म्हणजे अहेरितील पंढरपुरी चाय कॅफे येथे तुम्हाला महाराष्ट्रातील पंढरपुरी मसाल्याचा खास चहा प्यायची संधी मिळेल.पंढरपुरी चहा अहेरीच्या मेनरोडवरील आझाद चौकात असलेल्या पंढरपुरी कॅफेमध्ये उपलब्ध आहे. या कॅफेच्या मालक राहुल शंकर अनलवार असून त्यांचे वडील शंकर अनलवार यांचे प्रसिद्ध नमो चाय सुद्धा त्याच चौकात आहेभे विशेष.अहेरीतील लोक इथे येऊन या चहाचा मनसोक्त आस्वाद घेत आहेत. महाराष्ट्राचा खास पंढरपुरी चहा शुगर आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठीही फायदेशीर आहे, त्यामुळे या चहाचा आस्वाद सहज घेता येतो, असे सांगितले जाते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .